मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 18 ऑगस्ट 2025 | पान- 1



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# वाकड, पुनावळे, किवळे कोंडी सुटणार!

## सेवा रस्त्यांचे रुंदीकरण : किवळे ते बालेवाडी एलिव्हेटेड कॉरिडॉर तयार करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड येथील सेंट्रल चौक आणि मुंबई-बंगळुरू महामार्गावरील (देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्ग) किवळे मुकाई चौक, पुनावळे, ताथवडे, वाकड येथील भूमकर व भुजबळ चौकातील वाहतूक कोंडी लवकरच सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



कारण, बाह्यवळण मार्गाच्या दोन्ही बाजूंच्या सेवा रस्त्यांचे प्रत्येकी १२ मीटर रुंदीकरण आणि किवळे ते बालेवाडी स्टेडिएमपर्यंत सुमारे ८.६ किलोमीटर अंतरावर ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची (उन्नत मार्ग) निर्मिती करण्यात येणार आहे. त्याचा ‘डीपीआर’ तयार असून आवश्यक जागेचे महापालिकेने भूसंपादन सुरू केले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतून मुंबई-बंगळुरू महामार्ग जातो. वाकड भूमकर चौक, ताथवडे व पुनावळेतील भुयारी मार्ग, किवळेतील मुकाई चौक आणि देहूरोड येथील सेंट्रल चौकात अनेकदा वाहतूक कोंडी होते. ती सोडविण्यासाठी आणि भविष्यातील नियोजनाबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत महापालिकेत गेल्या महिन्यात सादरीकरण केले. त्यानुसार कामाला लवकरच सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये किवळे मुकाई चौक ते बालेवाडी स्टेडियमपर्यंत ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची निर्मिती केली जाणार आहे. त्याबाबतचा आराखडा तयार आहे.

### भूसंपादन प्रक्रिया सुरू

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला जवळपास ८५ टक्के शेतकऱ्यांनी जमिनीचा ताबा दिला आहे. आता अतिक्रमणे हटविण्यासाठी मार्किंग सुरू आहे. शेतकऱ्यांना मोबदला मिळावा यासाठी त्यांनी त्वरित नगररचना विभागात प्रस्ताव दाखल करावेत. काही ठिकाणी कॅम्प लावून मोबदला दिला जाईल, असे महापालिका नगररचना विभागातील एका अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ...असा असेल एलिव्हेटेड मार्ग

- एलिव्हेटेड मार्गिका (लेन) : चार
- रस्त्यावरील मार्गिका : चार
- वाकड भूमकर चौक : दुमजली उड्डाणपूल
- मुळा नदीवर पूल : तीन मार्गिका वाढविणार
- मुठा नदीवरील पूल : दोन्ही बाजूस तीन मार्गिका वाढविणार
- भुयारी मार्ग : किवळे चौक, समीर लॉन, पुनावळे, ताथवडे, भूमकर चौक

# सोनसाखळी चोरी करणारी टोळी गजाआड!

## तबबल 12 लाखांच्या सोन्यासह मुद्देमाल हस्तगत

**पिंपरी | प्रतिनिधी**




सोनसाखळी हिसकावणाऱ्या टोळीला पिंपरी- चिंचवड गुन्हे शाखा युनिट तीन (CHAKAN)च्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. २० ते २६ वर्ष वयोगटातील या टोळीतील आरोपींकडून १२ लाख ३१ हजारांचे १० तोळे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत.

धक्कादायक म्हणचे याच टोळीकडून अहिल्यानगरमधील सुपा येथे सोनसाखळी हिसकावताना मे महिन्यात महिलेचा रस्त्यावर पडून मृत्यू झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा देखील दाखल होता. याच टोळीचे एकूण वेगवेगळे १५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

गुन्हे शाखा युनिट ३ पोलिसांनी याप्रकरणी( CHAKAN) अक्षय राजू शेरावत, ऋषी बुद्धिमान नानावत, अरमान प्रल्हाद नानावत आणि सोनू फिरोज गुडदावत यांना महाळुंगे एमआयडीसी भागातून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. दरम्यान चोरीतील सोनसाखळी, सोन्याचे दागिने विकत घेणारा सराफ खुशालसिंग जोधसिंगराव याला देखील पोलिसांनी अटक केली आहे.

### पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये सध्या चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. घरफोड्या, दुचाकी व चारचाकी चोरी, दुकानांमध्ये चोरी तसेच महिलांच्या साखळ्या ओढण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे आणि शहराच्या कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलिस यंत्रणेकडून काही ठिकाणी कारवाई होत असली तरी, गुन्हेगारांचे धाडस दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र दिसून येते. सीसीटीव्ही, सुरक्षा यंत्रणा असूनही चोर सर्रास गुन्हे करत आहेत, जे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर संशय निर्माण करते.

या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने पेट्रोलिंग वाढवणे, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे, तसेच स्थानिक रहिवाशांच्या मदतीने वॉच ग्रुप तयार करणे अशा उपाययोजना तातडीने राबवणे आवश्यक आहे. अन्यथा वाढत्या चोरीच्या घटना नागरिकांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण करू शकतात.

### पोलिसांकडून मिळालेली माहिती...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चारही आरोपी हे पादचारी एकट्या महिलेला हेरून तिच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पळ काढत असायचे. आत्तापर्यंत पुणे ग्रामीण, अहिल्यानगर, पिंपरी-चिंचवड परिसरात सोनसाखळी हिसकावल्याचे गुन्हे उघडकीस आले आहेत. दरम्यान, २० मे २०२५ रोजी अहिल्यानगर सुपा येथे आरोपी अक्षय आणि ऋषी नानावत यांनी महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावताना महिला रस्त्यावर पडून गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला होता. या प्रकरणी दोघांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल आहे. त्यांना सुपा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलं आहे. चार ही आरोपींना महाळुंगे एमआयडीसी परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. ही कामगिरी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील जावळे, राजाराम लोणकर, योगेश आढारी व त्यांच्या सहकार्यांच्या पथकाने केली आहे.

# पवना धरण ९५% भरले; वर्षभर पुरेल इतका साठा

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते जलपूजन: पिंपरी-चिंचवडकरांसाठी दिलासादायक बातमी

**पुणे | प्रतिनिधी**

पवना धरण आज तब्बल ९५ टक्के भरले असून, यंदा वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड शहरवासीय आणि मावळ परिसरातील नागरिकांची पाण्याची चिंता मिटली आहे. धरणातील गाळ काढल्याने पाणीसाठवण क्षमताही लक्षणीय वाढली आहे, अशी माहिती मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते पवना धरणात जलपूजन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी, शिवसेनेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, "गेल्या आठ वर्षांत ८५ हजार क्युबिक मीटर गाळ धरणातून काढण्यात आला आहे. त्यामुळे धरणाची साठवण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली असून, आज हे धरण ९५ टक्क्यांपर्यंत भरले आहे. हा साठा वर्षभर पुरेल, हे निश्चित आहे."



पवना नदी सुधार प्रकल्पालाही मिळाले गती बारणे यांनी सांगितले की, पवना नदी सुधार प्रकल्पासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता, आणि आता पीएमआरडीए तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्यामार्फत हा प्रकल्प राबविला जाणार आहे. नदी स्वच्छ ठेवण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार असून, त्यामुळे नदी पात्रात अशुद्ध पाणी जाणार नाही. याचा थेट फायदा नागरिकांना शुद्ध पाणी स्वरूपात मिळणार असून महापालिकेचा पाणी शुद्धीकरण खर्चही कमी होणार आहे.

**उपस्थित मान्यवर**

या जलपूजन कार्यक्रमास पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, संत तुकाराम सहकार साखर कारखान्याचे संचालक लक्ष्मण भालेराव, तालुका प्रमुख राजाभाऊ खांडभोर, युवासेना लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, सोशल मीडिया प्रमुख सुदर्शन देसले, तसेच इतर अनेक शिवसेना पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा



पूर्वी दोन दिवसाआड पाणीपुरवठा मिळणाऱ्या शहराला आता नियमित पाणीपुरवठा शक्य झाला आहे. पवना धरणातून दररोज ६ एमएलडीहून अधिक पाणी पुरवठा होतो. धरणाच्या साठवण क्षमतेतील वाढीमुळे शहराला तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत नाही, हे विशेष. पवना धरण ९५% भरले असून, वर्षभर पुरेल इतका साठा आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे साठवण क्षमतेत वाढ झाली आहे. पवना नदी सुधार प्रकल्पालाही गती मिळाली असून, यामुळे नदी स्वच्छ राहणार आहे आणि नागरिकांना शुद्ध पाणी मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड आणि मावळकरांसाठी ही दिलासादायक बातमी ठरली आहे.

# गोविंदा रे गोपाळा... मच गया शोर सारी नगरी रे..!

## शहर आणि परिसरात दहीहंडी उत्सव दिमाखात : बाळगोपाळांनी लुटला आनंद!






### सहा थरांची थरारक दहीहंडी

**या मानाच्या दहीहंडीचा थर चेंबूर येथील श्री शितळादेवी गोविंदा पथकाने तब्बल सहा थर लावून फोडला. त्यांच्या साहसपूर्ण प्रदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली. टाळ्यांच्या कडकडाटात, "गोविंदा आला रे!" च्या घोषात आणि गुलालाच्या उधळीत ही दहीहंडी पार पडली.संदीप भाऊ वाघेरे यांच्या कुशल नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीत आणि भव्यतेत पार पडला. सोशल मीडियावर आणि स्थानिक वर्तुळात त्यांच्या आयोजनाचं विशेष कौतुक होत आहे. उत्सवाच्या निमित्ताने नागरिकांना एकत्र आणणारा हा कार्यक्रम सामाजिक सलोखा, परंपरा आणि नवचैतन्य यांचा संगम ठरला.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

नगरसेवक संदीप भाऊ वाघेरे यांच्या आयोजनेतून पिंपरी गावातील मानाची आणि भव्य दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरल्या सिनेतारका श्रिया सरण, आयशा खान आणि सायली संजीव – ज्यांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमात चारचाँद लावले. याशिवाय राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरही उपस्थित होते. यामध्ये मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान परिषद आमदार अमितजी गोरखे, उमाताई खापरे, नगरसेवक शितल उर्फ विजय शिंदे, राहुल कलाटे, हर्षल दोरे, भीमाताई फुगे यांचा समावेश होता. या मानाच्या दहीहंडीचा थर चेंबूर येथील श्री शितळादेवी गोविंदा पथकाने तब्बल सहा थर लावून फोडला. त्यांच्या या साहसी प्रदर्शनाला उपस्थित नागरिकांनी जोरदार प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संदीप भाऊ वाघेरे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. उत्साह, संस्कृती आणि एकोप्याचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम पिंपरीकरांच्या आठवणीत कायमचा कोरला गेला आहे.

**इंद्रायणी युवा प्रतिष्ठानतर्फे भव्य दहीहंडी उत्सव**

इंद्रायणी नगर येथे इंद्रायणी युवा प्रतिष्ठानच्या वतीने पारंपरिक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दहीहंडी उत्सवाला भव्य प्रतिसाद मिळाला. सार्वजनिक स्वरूपात आयोजित केलेल्या या उत्सवात हजारोंच्या संख्येने नागरिकांनी, विशेषतः गोपाळकाल्याच्या भक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

या दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे लोकप्रिय अभिनेत्री त्रिधा चौधरी आणि जिया शंकर यांची उपस्थिती होती. त्रिधा चौधरी या 'आश्रम', 'द चार्जशीट' आणि 'बंदिश बॅंडिट्स' यांसारख्या वेबसीरिजमधून प्रसिद्धीस आल्या आहेत, तर जिया शंकर यांनी 'वेड' चित्रपट, 'बिगबॉस ओटीटी २०२३' मधील सहभागामुळे रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या आगमनाने उत्सवाचा उत्साह अधिकच वाढला